आमच

"मुले कशीतरी आपोआप वाढवणे आणि "ती विचारपूर्वक वाढवणे या दोहोंत जमीन-अस्मानाचा भेद आहे. पालक जागरूक असतील तर ते आपल्या मुलांच्या वाढीचे कार्य हे लक्षपूर्वक करण्याची गोष्ट आहे असे मानतील व त्यासाठी आपला निश्चित वेळ देतील. याउलट आज सार्वत्रिक कौटुंबिक चित्र असे आहे की, पालक, म्हणजे आई व वडील दोघेही, अधिकाधिक पैसा कसा मिळेल याचाच सातत्याने विचार करीत राहतात. त्यांची समजूतही अशी असते की पैशांनी प्राप्त होणारी अधिकाधिक भौतिक सुखे मुलांना प्राप्त करून देणे म्हणजेच मुलांची काळजी घेणे अथवा त्यांची काळजीपूर्वक जोपासना करणे होय. या समजुतीतून पालकांना कसे बाहेर काढावे ही खरी आजची कौटुंबिक समस्या आहे. आणि ताराबाईंचे हे पुस्तक, पालकांना रास्त जाणीव करून देणारे, वागण्याची वेगळी दिशा देणारे आणि नेमका सल्ला देणारे आहे.

ताराबाई मोडक



# आमचे घर

# आमचे घर

**ताराबाई मोडक**

**नूतन बाल शिक्षण संघ प्रकाशन**
कोसबाड टेकडी. ता. डहाणू, जिल्हा. ठाणे. 401 703

पुस्तकाचे नाव – आमचे घर


लेखकाचे नाव – ताराबाई मोडक

प्रकाशकाचे नाव – नूतन बाल शिक्षण संघ प्रकाशन
कोसबाड टेकडी. ता.–डहाणू ,
जिल्हा – ठाणे. 401 703
( सर्व हक्क प्रकाशकांकडे राखीव)

मुद्रक – गाम बाल शिक्षा केंद्र
विकास मुद्रणालय,
कोसबाड टेकडी. ता.–डहाणू ,
जिल्हा – ठाणे. 401 703

प्रथम आवृत्ती – 1945
द्वितीय आवृत्ती – 1992
तिसरी आवृत्ती – 2006
चौथी आवृत्ती – 2008

किंमत – रूपये 20 = 00



ऐका आई,बाबा,ताई,दादा,काका,आणिक कोणी–
खरं सांगते ऐक वाटते बालवाडीची ताई तू ग,
छोट्या छोट्या चिंटूचे, गुलाबी गोब–या सोनीचे ,
विश्व आगळे, भाव वेगळे, त–हे त–हेचे बंध नाकळे,
जादूचे जग इवले इवले,गोडगोडूले अन् सानुले
समजून घेता येईल कां, सूर आपुला जुळेल कां ?
रूसून बसते, फुगून जाते, रडता रडता थकून जाते
आई ताई असता मी पण भाव मला ते अजाणते,
धडपडतो, कुरकुर ही करतो, पडतो तरी उभा राहतो
बाबांचे, अन् दादाचे नकळत अनुकरण दावितो
इच्छा झाली पापा घेतो नाही पटता धपके खातो
व्यक्तीचा सन्मान हाच का, का प्रेमाचा नवा धडा ?
रागे भरणे, शिक्षा करणे, जणू प्रेमाचा पडे सडा
नाही अनुभव नव्या जगाचा परके वाटे त्याचे 'घर'
खरंच सांगा अजाण बाळा कोणी देता माया घर ?
अश्रूंना ना किंमत त्यांच्या दीन बिचारी बालके !
जांणून घ्या इवल्या विश्वाला तीच तीन ही पुस्तके
आमचे घर , बालकांचा हट्ट , बिच्चारी बालके

## - प्रस्तावना -

स्नेहांकीत, पालक स्नेही, वाचक, जाणकार, शिक्षणप्रेमी , मा. कै. ताराताई मोडक यांची तीन पुस्तकांची त्रिगुणात्मक रचना नव्या स्वरूपात सादर करताना अभिमान वाटत आहे. आमचे घर , बिच्चारी बालके , बालकांचा हट्ट, ही तीनही प्रकाशने 1942 ते 1945 या कालावधीत झालेली. खरं तर ही पुस्तके नाहीत तर तो बालकांच्या मनातल्या, ह्रदयातल्या विचारांना प्रकट करण्यासाठी दिलेला उसना आवाज आहे. मा. परमपूज्य कै. ताराताई मोडक या बालकांना जाणून घेणा-या, बालविश्वाचे अंतरंग उलगडून दाखविणा-या एक मोठ्या वयाच्या बालकच म्हटल्या पाहिजेत. कारण इतकी मऊमऊ भाषा, कोवळे कोंब असल्यासारखी कोवळी भावनाप्रधान भाषा आणि बालकांइतकेच शुध्द असलेले भाव असे सर्व वैशिष्ठ्यानुसार असलेले लेखन लिहायला त्यांच्या भावजगात प्रवेश तर हवा? पण हे काही सहज साध्य नाही . यासाठी अतीव वात्सल्य , ममता, बालकत्वाचे अजाणपण, निर्व्याज शुध्दभाव तर पाहिजेतच ,पण शास्त्रज्ञांइतके प्रयोगांती, अनुभवांती निष्कर्ष काढण्याचे कसबही हवे.परमपूज्य ताराताई या बालकळ्यांना फुलविणा-या फुलराणीसारख्याच होत्या. म्हणूनच बालकांचे अंतरंग ,भावबंध मनोव्यापारांचे विश्व, कृतीयुक्त जगाची ओळख, भाषाविश्व , चमत्कृतींनी भरलेले बालकांचे अनुभव त्या जाणू शकल्या. इतकेच नाहीतर पालकत्वाची धुरा सांभाळणा-या जन्मदात्यांपासून ते शिक्षणदात्यांपर्यंत सर्वांनाच त्यांनी बालजगताचे दर्शन सुस्पष्टपणे घडविले.


प्रस्तुत पुस्तक 'आमचे घर' हे ' घर कसे असावे ' ह्या घरपणाविषयी धारणा स्पष्ट करते. 'घर' गरीब असो नाहीतर श्रीमंत, शिक्षित वा अशिक्षित पण 'घरपण' ही संवेदना जाणिवपूर्वक जोपासणे अत्यंत आवश्यक आहे. ' घर माझे हे मातीचे ,पण प्रेमाच्या भावाचे ' अशी स्थिती म्हणजे घर होय. घरातल्या प्रत्येक सदस्याला मानसन्मान, आपुलकी तिथेच मिळते. प्रसन्नता, श्रमाची जपवणूक , श्रमप्रतिष्ठा, स्नेहबंध , समाजाचे ऋण, अतिथी सन्मान, ज्ञानार्जनाचे संवर्धन ह्या व अशी शेकडो मूल्ये इथेच बाळगुटीतून दिली जातात, अर्थात् न सांगता हे दृश्य बालकांना घरात दिसणं आवश्यक आहे. मा. ताराताई हे विश्व एखाद्या लोलकाप्रमाणे आपल्यासमोर दृश्यमान करतात.

सोपी व लयदार शब्द योजना, आपलेच असतील इतके सहज संवाद या पुस्तकातील भावरम्यता तर वाढवतातच पण निखळ विचारांचे दर्शन आपल्याला अनुभवता येते.

खरं तर 'घराचीऊब' ही जाणवणारी असली पाहिजे. पण होत काय आजच्या तंत्र यंत्र युगात भावनिक ऊब महत्वाची वाटेनाशी झाली आहे. फक्त भौतिक सुखसाधने मुलांना देणे हाच एक प्रेम असणे याचा अर्थ घेतला आहे. झालय काय, आजचे आधुनिकीकरण बाळांचे मन जाणून घेणे कमीपणाचे मानते. त्यामुळेच 'पैसा' हा शब्द जीवनदायिनी ठरू पाहतोय. पैसा जगण्यासाठी आवश्यक आहे , विकासाला पोषकच आहे. पण ज्याचा विकास साधायचा त्या बालकाची प्रत्येक गरज पैशातून कधीच भागत नाही. ती घराच्या चार भिंतीतल्या मायेच्या स्पर्शातून, शब्दातून, पूर्ण होते. जाणिवेतूनच भावना फुलतील, भावनिर्मितीतून वैचारिक विकास साध्य होईल, तर वैचारिक विकास समाज व पर्यायाने राष्ट्राला नेतृत्व देवू शकतील किंवा समर्थ नागरीक निर्माण करू शकेल. असे हे 'आमचे घर ' नव्या रूपात , मा. ताराताईंच्या आशिर्वादाने सादर करीत आहोत. मा. ताराताईंची मातृवत छाया आमच्यावर आहे म्हणूनच हे कार्य साध्य होत आहे. माझी कोसबाडची भूमी या इमारतीच्या चिर् न् चिरा सदैव मातोश्री ताराताईना आठवत असतो. त्यांच्याच प्रेमाच्या बंधनात राहणे आमची कृतार्थता आहे. हे नवे प्रकाशन परमपूज्य ताराताईंच्या चरणी समर्पण करत आहोत.

विकास मुद्रणालयाचे श्री. काशिनाथ कदम यांची धावपळ या प्रकाशनामागे आहे. या सर्व ध्येयसिद्धीसाठी श्री. क्षीरसागर यांचा खंबीर पाठींबा होता. म्हणून प्रकाशन कार्य सहजपणे होत आहे. त्यांचे सहकार्य यापुढे असणारच आहे. म्हणून प्रेमाशिर्वाद मात्र निश्चित मागेन.

| | |
|---|---|
| सौ. कल्पना क्षीरसागर | श्री प्रकाश क्षीरसागर |
| संचालिका, | संचालक, |
| ग्राम बाल शिक्षा केंद्र, कोसबाड | ग्राम बाल शिक्षा केंद्र, कोसबाड |



## अनुक्रमणिका


पृष्ठ

१. प्रसन्नता .... ९
२. प्रेम .... १४
३. व्यक्तिसन्मान .... १९
४. उद्योग .... २४
५. व्यवस्था व नियमितपणा .... ३०

# घरची बालवाडी

गृहस्थाश्रमाचे केंद्र जे गृह ते बालपुष्पांचे उपवन होय. या बालकांच्या हृदयपुष्पांचे नीट जतन करण्यात आपण प्रसन्नता, प्रेम, व्यक्ति-सन्मान, उद्योग, व्यवस्था व नियमितपणा या सहा गोष्टी ध्यानात ठेवल्या, तर आपल्या घरची बालवाडी जोमाने वाढेल. नवीन रोपास योग्य जमीन, खत-पाणी देऊन वारा, कीड, अळी यांपासून त्यांचे जतन करून माळी जशी नवी रोपे काळजीपूर्वक वाढवितो तसे बालमनाच्या विकासास पोषक अशा या सहा गोष्टी आपल्या घरातील आपल्या छोट्या नाजूक रोपास मिळतात की नाही, ते मातापित्यांनी नेहमी पहावे.



# १. प्रसन्नता

पहिली गोष्ट प्रसन्नता. घरात पाऊल टाकल्याबरोबर बालकास प्रसन्न वाटले पाहिजे. गृहस्थाश्रम चालविणाऱ्या संसारी जनांच्या संसारयात्रेत अनेक अडचणी असतात.

अनेक वेळा काळजी, चिंता यांनी आपण ग्रासून गेलेले असतो. अनेक वेळा मनःक्षोभ झालेला असतो. कधी मनास शीण आलेला असतो; तर कधी भांड्यावर भांडे आपटून खणखणाट व्हावा तसे मोठ्या मंडळींचे एकमेकापरत्वे झालेले असते.

कधी आपण निराशेच्या जाळ्यात गुरफटून जाऊन निरुत्साही बनलेले असतो. संसाराच्या बऱ्यावाईट अनेकविध धूपछाया आपल्या मनावर पडत असतात ही गोष्ट जरी खरी आहे; तरी आपले घर म्हणजे आपल्या बालकांची वाडी आहे, उद्यान आहे हे विसरता कामा नये. आपल्या मानसिक तापाची झुळूकही ह्या कोवळ्या रोपांना लागली तर ती करपून जातात हे लक्षात ठेवून त्याच्याकरिता नेहमी प्रसन्नतेचे वातावरण ठेवले पाहिजे.

कोणी म्हणेल असे ढोंगाने प्रसन्नतेचे वातावरण ठेवले तर ते काय कामाचे? मुलांना ढोंग लगेच कळते व त्याचा उलट वाईटच परिणाम व्हावयाचा.

दुसरे कोणी म्हणेल बालकास कृत्रिमपणे केवळ प्रसन्नतेच्या वातावरणात वाढवून ऊन–थंडी सहन करण्याची त्याच्या मनाला केव्हाच ताकद यायची नाही.जर ती थोड्याशा दुःखाने आज करपून नि कोमेजून जाऊ लागली तर पुढील आयुष्यात येणाऱ्या बऱ्यावाईट प्रसंगाशी झुंझणे व टक्कर देणे त्यांच्याच्याने कसे होणार?

दोन्ही मुद्यांत थोडे तथ्य आहे. बालकांना ढोंग चटकन कळते ही गोष्ट अगदी खरी आहे. आईचे नाक–डोळे रडून रडून लाल झालेले असले व मूल जवळ आल्याबरोबर जर ते पदराने पुसून ती वरवर बोलू लागली तर मुलाला ते ताबडतोब कळते व आईच्या खोट्या हसण्याने काही प्रसन्नतेचे वातावरण उत्पन्न होऊ शकत नाही ; त्याचप्रमाणे बाप चिडलेला व संतापलेला असला तर ते मुलास कळल्यावाचून राहत नाही.मूल दुरून चेहऱ्याकडे पाहूनच रागरंग कसा काय आहे ते ताडीत असते. तेव्हा नुसते ढोंग करून भागत नाही ही गोष्ट खरी आहे. दुसरे असे की मोठी माणसेही आपल्या घरात नेहमी ढोंग करून कशी राहू शकतील? माणसाला आपल्या घरात तरी मोकळेपणा हवा असतो. समाजात, ऑफिसात, बाहेर धंदा वगैरेच्या सर्व जागी ढोंग करून मनातल्या भावना मनात गिळून राहावे लागते. मुलांच्या भीतीने घरातही जर तसेच राहिले तर माणसाला वेड लागायची पाळी येईल. असे स्थान पाहिजे की, माणसाला मोकळेपणाने वागता येईल.

गोष्ट खरी आहे. मुले ढोंग ताबडतोब ओळखतात हेही खरे, व घर ही मोकळेपणाने वागण्याची जागा आहे हेही खरे.

मग प्रश्न असा पडतो की प्रसन्नतेचे वातावरण राखायचे कसे?

आपण दुःखीकष्टी असतानाही बगिचात जाऊन बसलो, तेथील फुलांना हसताना डोलताना पाहिले, पक्ष्यांचे मंजूळ गाणे ऐकले तर क्षणभर दुःख विसरून त्याबरोबर स्मित करू लागलो की नाही? बालकांनी भरलेल्या घराचे तसेच आहे.

"ही कारटी कशाला गडबड करताहेत!" अशा वृत्तीने त्याकडे पाहिले तर कारट्याचे साधे बोलही असह्य होतात व त्यांना खूप बदडून काढावे अशी क्रूर वृत्ती जागृत होऊ लागते. परंतु वाडीतील बालपुष्प या दृष्टीने त्याकडे पहावे. संसारातील जालिमात जालीम दुःखाने आपण पीडित असलो तरी त्यांच्या गोड बोलण्याने भर उन्हाळ्यात पहाटेच्या थंड वाऱ्याच्या झुळकेने जसा आल्हाद वाटतो तसा आल्हाद आपल्या तापलेल्या मनाला होतो. प्रसन्नतेचे वातावरण मुलांकडूनच आपल्याला मिळू शकते. अनेकानेक वेळा हृदयाच्या भयंकर पीडा, काळजी,



निरुत्साह, अपमान, वाटेल त्याने मन गांजलेले असो, बालवाडीत गेले की ती बिचारी आपल्या मनास आल्हाद देण्यास सदा प्रसन्न, सदा ताजी, सदा उत्साही, सदा प्रयत्नशील, सदा जिज्ञासू असतात व आपल्या सुखातच काय पण दुःखातही भागिदारी करून ती आपणास रिझवतात.

तेव्हा स्वतः दुःखी–कष्टी असताना प्रसन्न कसे राहायचे याचे उत्तर हेच की, बालकाकडूनच प्रसन्नता मिळवायची. त्यांना आपल्या जड वातावरणात ओढून न घेता आपण त्यांच्यात शिरायचे.

दुसरे उत्तर असे की, दुःख झाले म्हणून उदास होऊन बसायचे अथवा चिडचिड, मारहाण करायची, किंवा रागवायचे वगैरे प्रकारच्या जशा सवयी आपण आपल्याला लावाव्या तशा लागतात. ऑफिसात काही त्रास झाला किंवा बाजारामध्ये व्यापार नीट झाला नाही की, घरी येऊन संतापायचे, नीट जेवणखाण करायचे नाही, तुसड्यासारखे वागायचे, मूल पुढे काही बोलायला सांगायला आले तर त्याला बदडायचे, अशी सवय ठेवली तर तशी लागते. म्हणजे आपल्या सुखदुःखाच्या भावनांना नेहमी दुधासारखा ऊत येऊ देत गेले तर त्या उतासच जाऊ लागतात व त्यांना जरा मनातल्या मनात संथपणे वाहण्यास लावले तर त्या तशा राहतात. ढोंग करू नये परंतु मनोविकारावर ताबा मिळवून वागण्यास शिकले तर ते शक्य आहे. घरात जंगलीपणाने न रहाता भावनांचा व कृतीचा संस्कृतपणा आणावा.

त्यातून आता बरीच खडाजंगी होणारच असे वाटल्यास शक्य असल्यास मुलांना बाहेर पाठवून मग खडाष्टक उडवावे. नाहीतर आपण बाहेर जाऊन ते उरकून घ्यावे व मुलापुरती तरी घरात शांती राहू द्यावी. घरातील खडाष्टक मुलांच्या आनंदाशी खडाष्टक आणते.

दुसरा मुद्दा जरा अधिक महत्वाचा आहे. मुलांना नेहमीच प्रसन्नतेच्या वातवरणात ठेवले तर ती जगाच्या कठोर वातावरणात वागण्यास तयार कशी होतील? ती मुद्दाम कृत्रिमपणे उत्पन्न केलेल्या समशीतोष्ण वातावरणात वाढलेल्या रोपाप्रमाणे (Hot–house plants) नाजूक व ऊन–वारा सहन करण्यास असमर्थ अशी होतील, ती काय कामाची?

त्याला उत्तर असे आहे की, उत्तम कलमी आंब्याची किंवा कोणत्याही झाडाची रोपे आणून लावली की, प्रथम काही दिवसांकरिता माळी त्यांच्याकरिता तट्ट्यांची सावली करतो व अत्यंत ऊन, पाऊस, वारा, थंडी वगैरेपासून त्यांचे रक्षण करतो. जरा मोठी होऊन निसर्गाचा कडकपणा सहन करण्याची ताकद त्यांच्यात आली की, तट्ट्ये काढून टाकतो. तीच परिस्थिती बालकाची आहे. त्यांना जगाच्या टक्क्याटोणप्यापासून दूर ठेवून टक्केटोणपे खाण्यास कायमचे असमर्थ बनवायचे नाही; परंतु पुरती शक्ती येईपर्यंत त्यांना संभाळायचे. कोवळ्या वयात सक्त आघात बसून ती करपणार नाहीत, कोमेजणार नाहीत याची काळजी घ्यायची. बालकांना बालजगातील सुखदुःखे, अडीअडचणी असतातच. बळी तो कान पिळी या न्यायाने गुंडप्रवृत्तीच्या बालकाची हडेलहप्पी असते, मान-अपमान असतो, आशा–निराशा असतात, आकांक्षा असतात, मैत्री असते, मैत्री तुटण्याचे दुःख असते. सर्व सर्व काही असते. त्यांच्या जीवनात आपण मध्ये पडून त्यांचे दुःख त्यांना सहन करण्यास किंवा तोंड देण्यास शिकता येणार नाही असे करू नंये म्हणजे झाले. ती आपणास त्यांच्या सुखदुःखाचे भागीदार करीत असल्यास व्हावे व शक्य असेल तेथे त्यांना आपल्या सुखदुःखाचे भागीदार करावे. परंतु त्यांच्या लढाया आपण लढून त्यांचे त्यांना मजबूत होण्यापासून परावृत्त करू नये. म्हणजे ती ऊन–थंडी सहन करू न शकणारी, कृत्रिम वातावरणात वाढलेली नाजूक रोपे होणार नाहीत व घरात प्रसन्नतेचे वातावरण नेहमी असल्याकारणाने ती निष्प्राण व नाजूक मनाची होतील अशी भीती बाळगण्याची जरूरी नाही. उलटपक्षी प्रसन्नतेच्या वातावरणात त्यांचा आत्मा खुलतो. त्यांच्यातील उत्तम वृत्ती, शक्ती यांना बाहेर येण्यास अवकाश मिळतो. थोडक्यात म्हणजे त्यांच्या मनोविकासास पोषण मिळते.

म्हणून आपले घर नेहमी प्रसन्नतेने भरपूर असे ठेवण्याची प्रथम काळजी घ्यावयास हवी.



**प्रसन्नता कशी ठेवायची?**

पहिली गोष्ट म्हणजे एकमेकांना नावे ठेवणे, एकमेकांच्या विरुद्ध बोलणे, नेहमी मतभेद दाखविणे, शेजाऱ्यापाजाऱ्यासंबंधी अनुदारपणे बोलणे, वगैरे टाळले पाहिजे.

थोड्याथोडक्यावरून भांडण-तंटे, एकमेकांना घालून-पाडून बोलणे, टाकून बोलणे व दुखवणे हेही सोडले पाहिजे.

दुसरी गोष्ट म्हणजे सर्वांनी मिळून गोष्टी करणे. एकत्र बसून आपापल्या गोष्टी सर्वांनी सांगण्याची रीत असली तर कुटुंबात ती मोठ्या आनंदाची वेळ असते. छोटा बाळू आपल्या शाळेतली काही हकीकत सांगतो, दादा आपल्या कॉलेजातील काही गंमत सांगतो, माई आपल्या शाळेतली, तर वडील आपल्या सबंध दिवसातले काही, तर आई आपल्या घरचे; असे मिळून गंमत तर होतेच; पण कुटुंब एका सूत्राने बांधले जाऊन प्रसन्नता उत्पन्न होते.

सर्वांनी मिळून काही खेळणे, भेंड्या लावणे किंवा शब्द ओळखणे वगैरे प्रकारचे खेळ लहानमोठी मिळून खेळली तर त्याने फारच सुंदर वातावरण उत्पन्न होते.

तशाच सहली, फिरावयास जाणे, काही पहावयास जाणे, वगैरेमुळेही चांगले वातावरण उत्पन्न होऊ शकते.

गाणे–बजावणे, गोष्टी सांगणे, नृत्य करणे, नाटक करणे वगैरे गोष्टीही घरची मंडळी सुट्टीत मिळून करू शकतात.

एकंदरीत आई-बाप व मुले यांचे संघटित जीवन वाढले म्हणजे दोघांनाही एकमेकांपासून आनंद मिळतो व मनाची प्रसन्नता येते.

# २. प्रेम

आमचे घर उमलण्यास दुसऱ्या एका गोष्टीची आवश्यकता आहे. ती म्हणजे प्रेम. कुटुंबसंस्थाच सबंध प्रेमाच्या पायावर उभारली आहे. स्त्रीपुरुष गाढ प्रेमाने आकर्षिली जातात. प्रेमाने जोडली जातात. प्रेमामुळे एकत्र राहतात, दुसऱ्या सर्वांपासून निराळी होऊन दोघेच एकमेकांची होऊन राहतात, एकमेकांसाठी राहतात, एकमेकांमध्ये राहतात. या रीतीने प्रेमाच्या पायावर त्यांचा संसार उभारला जातो. त्यांची मग दोहोची चार होतात. सहा होतात. कितीही झाली तरी ती सर्व एकमेकांची असतात. प्रेमाच्या एका धाग्याने एकमेकांशी घट्ट बांधलेली असतात.

असे असून कुटुंबात नेहमी प्रेमाचे साम्राज्य दिसते का? कोणत्याही घरी केव्हाही जाऊन उभे राहिले तर प्रेमाचे स्निग्ध वातावरणच नेहमी पाहावयास मिळेल अशी खात्री बाळगता येत नाही. पुष्कळ ठिकाणी प्रेमाचा अभाव, रुक्षता दिसून येते. स्पर्धा, इर्ष्या, 'माझे-तुझे' याचे विष जास्त प्रमाणात दिसून येते. त्यामुळे 'प्रेम' एक आवश्यक गोष्ट आहे असे म्हणण्याची वेळ येते.

प्रेमाचे वातावरण बिघडण्यास मुख्यतः कारण स्वार्थीपणा. प्रेम स्वार्थत्याग मागते.'मी, नाही पण 'आपण' ही वृत्ती व्हावी लागते. पण वृत्ती तशी न होता दुसऱ्याच्या त्यागाचा फायदा घेऊन कोणीही व्यक्ती स्वतः स्वार्थी होऊ लागते तेव्हा प्रेमाचा पाया हादरतो.

मुले तर प्रेम मागतात. प्रेम देतात. परंतु ती स्वतः स्वकेंद्रित अधिक असतात. प्रेमाकरिता ती दुसऱ्यास देण्यास तयार होतील; पण न देता स्वतःच खाऊन टाकावे, स्वतःकरिताच वस्तू ठेवून घ्यावी वगैरे प्रकारची वृत्ती पुष्कळदा प्राधान्य पावते आणि तेथेच प्रेम व स्वार्थ यांचे द्वंद्व सुरू होते.



बालकाच्या चिमुकल्या मनातील ही स्वाभाविक द्वंद्वे प्रेमाचा फारसा नाश करू शकत नाहीत. परंतु त्यास जेव्हा मोठ्यांकडून पुष्टी मिळते तेव्हा ती प्रेमनाशास कारणीभूत होतात.

आपण मोठीच भावंडाभावंडामध्ये, मित्रामित्रांमध्ये, स्पर्धा लावून कित्येकदा प्रेमाचा नाश करीत असतो. 'हा शहाणा, ती वेडी' असे आपण म्हटले की, भावाबहिणीत प्रेमाऐवजी द्वेषाचे तत्व पेरले जाते. 'हा असा, तो तसा' अशी तुलना आपण करीत असतो व त्यामुळे स्पर्धेचे, द्वेषाचे व ईर्ष्येचे बीज पेरले जात असते. भावाभावांमध्ये, मित्रामित्रांमध्ये, जवळच्या, लांबच्या आप्तवर्ग वगैरेमध्ये हे विषाचे बीज आपण मोठीच पेरतो; कारण ते आपल्यात असते. आपल्या मोठ्या मंडळीचा तरी व्यवहार प्रेमाच्या पायावर कोठे उभारलेला असतो? जगाचा व्यवहार म्हटला म्हणजे स्वार्थ व दुष्टपणा यांच्याच पायावर उभारला पाहिजे असे आपण ठरवून टाकतो व त्याची झुळूक कोवळ्या मनाच्या बालकास लागू देत असतो.

बालकाच्या विकासासाठी स्पर्धा ही तर हवीच असे प्रामाणिकपणे मानणारे कित्येक जण आहेत. किंबहुना असेच मानणारी सर्व आहेत. न मानणारीच कोणी अपवादात्मक असतील व तीच मूर्ख ठरतात. स्पर्धेने बालजीवनाचे किती गंभीर नुकसान आपण करीत असतो याची कल्पना नसते. स्पर्धेने मागे राहणाराचे नुकसान होतेच, परंतु वर येऊन बक्षिसे व शाबासकी मिळवणाराचेही जन्मभर पुरेल असे गंभीर नुकसान होत असते. कारण त्याला सतत सावध असावे लागते की, दुसरे कोणी येऊन आपल्यापुढे तर जात नाही ना? त्यामुळे कोणाच्या सहकार्याने अभ्यास करणे, ज्या कोणाला येत नाही त्याला मदत करणे, समजावून सांगणे वगैरे प्रेमाचा व्यवहार कधीच ठेवू शकत नाही. त्याला दुसऱ्याचा उत्कर्ष, पुढे जाणे, कधीच सहन होत नाही. कारण नेहमी स्वतःच पहिले असण्याची त्यास सवय झालेली असते. त्यास जगाच्या जीवनकलहात फार सक्त फटके खावे लागतात. कारण पुष्कळदा त्याचे डोके आपण कोणी फार मोठे आहो या विचाराने फुगलेले असते.

एकंदरीत बालजीवनातील सुखाचे क्षण नाहीसे करणारे प्रेमाचे धागे तोडून टाकणारे, मैत्रीस जमीनदोस्त करणारे स्पर्धेसारखे दुसरे वाईट तत्व नाही.

वर म्हटल्याप्रमाणे स्पर्धेच्या पोटी ईर्ष्या जन्म पावते व प्रेमत्वाची हकालपट्टी होते.

घरातील मोठ्या मोठ्यांच्या एकमेकांशी होत असलेल्या वर्तनाचाही मुलाच्या मनावर परिणाम होतो. आई-बापामध्ये जेथे गाढ प्रेम असते, घरातील इतर माणसे नणंद-भवजय, सासू-सून, भाऊ-भाऊ, जावा-जावा सर्व प्रेमाने वागत असतील तेथे मुलांनाही प्रेमाचे वातावरण मिळते. परंतु सदाची भांडणे, एकमेकाविषयी अनुदार वचने, क्रोध, संताप वगैरे पाहण्यास मिळत असतील तेथे मूल प्रेमाच्या वातावरणात कसे राहू शकेल? मुलाला जवळ घेऊन त्याचे कितीही लाड केले, प्रत्येकाने आपापल्या मुलास जवळ घेऊन त्यावर कितीही प्रेम केले तरी त्या मुलास प्रेमाचे वातावरण मिळाले असे म्हणता येणार नाही. सहारा वाळवंटातून मधूनमधून स्वतःच्या डोक्यावर बर्फाची पिशवी कोणी ठेवीत असले तरी एकंदर वातावरण तापलेले असताना बर्फाच्या पिशवीचा कितपत उपयोग होईल?

आपण आपले कुटुंबजीवन तपासले पाहिजे. आपले वर्तन, आपले हृदय, आपली राहणी तपासली पाहिजे अगदी प्रामाणिकपणे, अगदी बारकाईने तपासली पाहिजे, म्हणजे आपणामध्ये प्रेमाचा अंश किती आहे ते आपणाला कळून येईल.

स्पर्धेप्रमाणे अन्याय व दुर्लक्ष यामुळे बालजीवनातील प्रेमतत्वे निघून जाऊन त्या जागी कडूपणा, जगाचा तिटकारा, जगावर सूड घेण्याची वृत्ती वगैरे असंतुष्ट माणसाचे दुर्गुण प्रवेश करतात. मुलाची तशी वृत्ती होण्यास पुष्कळदा आईबापच कारणीभूत असतात.

घरात दोन मुलांमध्ये एखाद्याच्या बाबतीत पुष्कळदा अन्याय होतो. कधी एक मूल आपले असते, दुसरे भावाबहिणीचे किंवा कोणा तरी नातलगाचे असते.

नातलग मुलाला वाढविण्याची चाल अर्थात प्रेमबुद्धीने पडली आहे परंतु व्यवहारात घरची—स्वतःची मुले व स्वतःवर अवलंबित मुले यांच्यात जो कळतनकळत फरक राहतो, त्यामुळे आपल्या व दुसऱ्या अशा दोन्ही मुलांचे नुकसानच होत असते. त्यापेक्षा गरिबास पाच पैसे उचलून देऊन मदत करावी; पण घरात कायमचा अन्याय शिरू देऊ नये.



खरोखरच मुलांत मुळीच भेद न करता त्यांना वागवता येत असतील, नुसते वागवताच नव्हे तर अंतःकरणापासून सारखे प्रेम करता येत असेल तरच अशी इतर मुले घरात बाळगावी. प्रेम करणे काही अशक्य नाही. पूर्वीच्या एकत्र कुटुंबपद्धतीत घरची सगळी मुले सारखी असे मोठी माणसे वागवीत असत. परंतु आता दिवसेदिवस सख्ख्या भावाभावांना की भावाबहिणींना वागवणे, लाड करणे, प्रेम व्यक्त करणे वगैरे सर्वासंबंधी फार भिन्नता आढळते. शिवाय खर्चाच्या बाबी वाढल्या आहेत व राहणी बदलली आहे, महागाई आहे व त्या मानाने तितका पुरेसा पैसा नसतो. अशा काळात मनात नसूनही स्वतःच्या मुलात, अवलंबित मुलात नकळतपणे फरक होतोच व पुष्कळदा त्याचे कायमचे दुष्परिणाम मुलांना भोगावे लागतात.

कित्येकदा आपले व परक्याचे असे नसूनही सख्ख्या भावंडातही अन्याय होत असतो अथवा निदान मुलांना तरी अन्यायाचा भास होतो. या सदरातच दुर्लक्षित मुलेही येतात. एकाच घरातील, एकाच कुटुंबातील मुलात एखाद्यास आपण दुर्लक्षित आहोत असे वाटते व पुष्कळदा ते तसेच असते. विशेषतः भाऊ व बहीण अशी भावंडे असतात. त्यांत कधी भाऊ म्हणून त्याला विशेष हक्क व विशेष लक्ष मिळते आणि प्रत्येक बहिणीस प्रत्येक क्षणी हा फरक जाणवत असतो. कधी कधी याच्या उलटही होते. बहिणीस नेहमी चांगले कपडे, नवे फ्रॉक, नवे दागिने, फुले वगैरे घालून वडिलमंडळी नटवतात व तिचे कौतुक करतात. ती नाजूक म्हणून तिला कामे कमी सांगतात व भावांना तो काय 'टोण्या' आहे; 'इकडे जा', 'हे आण', 'ते उचल', असे नेहमी काम सांगतात. मुलगे दिसायला भावनाप्रधान दिसले नाहीत तरी मनाने पुष्कळदा नाजूक असतात. तसेच कधी एखादे मुल कुरूप असते म्हणून, व्यंगयुक्त असते म्हणून, बुद्धीने मंद असते म्हणून किंवा कधीकधी दिसण्यासारखे एकही कारण नसताना एखादे मूल आईबापाचे नावडते असते व त्याच्यावर नेहमी अन्याय व दुर्लक्ष होत असते. आपल्या लक्षातही येत नाहीत अशा लहानसहान गोष्टीत मुलांना फरक जाणवत असतो. आईच्या प्रेमातील फरक मुलांना जितका असह्य असतो तितके दुसरे काहीच नसते. एका मुलाला शिंक येते; आई दुसऱ्या खोलीत असली तरी तिचे लक्ष जाते. त्याला गरम कपडा

घालण्यास सांगते, नाहीतर स्वतः त्याला ती घालते. दुसऱ्याला शिंकच काय चांगले पडसे आलेले असते. त्याला बरे नाही हे आईच्या लक्षातच येत नाही. मुलाला मात्र या बारीक गोष्टी इतक्या जाणवतात की त्याच्या सबंध आयुष्याचा रंग त्यामुळे बदलून जातो.

कित्येकदा मुलाला वाटणारा फरक खरा असतो. पण, त्याचे कारण प्रेमाचा अभाव किंवा अन्यायमूलक भेद नसून काही वास्तविक कारण असते. एखादे मूल आजारी पडून अशक्त झालेले असते. त्याला जास्त जपावयास हवे असते व त्यास विशेष जपले की, दुसऱ्या मुलास विनाकारण वैषम्य वाटते. नुकत्याच जन्मलेल्या मुलास आई सबंध व सारा वेळ मिळते आणि घरातल्या इतर मंडळींचेही त्याच्याकडे विशेष लक्ष असते, हे त्याच्या मोठ्या भावंडास सहन न होण्याची उदाहरणे तर घरोघर दिसून येत असतील.

कोणत्याही कारणाने असो, मुलाला अन्यायाचा भास होणे किंवा दुर्लक्षित वाटणे व त्यामुळे आपण प्रेमाच्या वातावरणात वाढत नाही असे वाटणे केव्हाही चांगले नाही. त्याचे वाटणे खरे असल्यास प्रयत्नपूर्वक उपाय करून आपल्या वागण्यात फरक केला पाहिजे, आणि त्याचे वाटणे चुकीचे असल्यास आपल्या वर्तनानेच त्याची चूक त्याच्या लक्षात आणून दिली पाहिजे. आपण दुर्लक्षित आहोत असे वाटणाऱ्या मुलास आजारी किंवा लहान मुलाच्या जोपासनेत व लाड करण्यात भाव घेण्याची संधी दिली तर आपले महत्त्व कमी न होता उलट वाढले असे वाटून त्याचे समाधान होते. एकंदरीत छोट्या वाटणाऱ्या गोष्टीचाही घोर परिणाम होऊ शकतो. हे लक्षात घेऊन बालकास घरात पूर्ण प्रेमाचे वातावरण मिळण्याचा हक्क आहे व तो त्यास मिळालाच पाहिजे हे ध्यानात ठेवावे.

आपले घर-गृहवाडी सुंदरपणे उमलण्यात प्रसन्नतेस प्रेमाची जोड मिळावयास हवी.



# ३. व्यक्तिसन्मान

प्रसन्नता व प्रेम यांच्या जोडीस व्यक्तिसन्मान हवा.

घरातील प्रत्येक व्यक्ती आपापल्या घरात सन्मानित असलीच पाहिजे.

कित्येक कुटुंबांत आईस मानच नसतो. बाप, आजी किंवा आत्याबाई तिला वाटेल तसे टाकून बोलतात. तिने काही करायचे म्हटले की, ते हटकून होऊच शकत नाही. तिने आपले मत म्हणून काही सांगितले की, ते सगळीजण खोडून काढतात व ती किती मूर्ख आहे ते दाखविण्याचा प्रयत्न करतात.

कित्येक कुटुंबांत याच्या उलट पित्याची अपमानित अवस्था असते. तो माल वाहणाऱ्या बैलासारखा खपतो व महिन्याकाठी चार पैसे आणून देतो व तेथे जणू त्याचे काम पुरे झाले; बाकी 'असे नाही, असे' म्हणायची की आपले मत दर्शवण्याची त्याची प्राज्ञा नसते. आपल्या मताप्रमाणे घरात काही करण्याची मग कोठून सोय असणार?

घरातील स्त्रीपुरुष यांच्याशिवाय इतरांची तर पुष्कळदा अशीच अवस्था असते. आश्रित अथवा अवलंबित अशी जी स्त्रीपुरुषे घरात राहत असतात त्यांची अशी दशा असते. घरातील कारभार एक अथवा दोघांच्या मताने चालणे हे ठीक आहे. पण त्यामुळे इतरांचा अपमान करण्याची, मानखंडना करण्याची, त्यांना टाकून बोलण्याची, त्यांना मूर्खात धरण्याची जरुरी नाही.

याप्रमाणे घरात एक अथवा अधिक मोठी माणसे नेहमी अपमान व अवहेलना अनुभवीत असली तर ते घर कीड लागल्याप्रमाणे दिसू लागते. घरात राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा योग्य सन्मान राखला गेला पाहिजे.

व्यक्तिसन्मान जसा मोठमोठ्यांमध्ये ठेवायचा तसा लहान बालकांचाही ठेवला पाहिजे व ही गोष्ट फार कठीण आहे. लहान मुलांना मान-अपमान असतो व अपमानाने त्यांची मनें दुखावतात, खट्टू होतात, याची तर मोठ्या मंडळींस कल्पनाच नसते. मुलांना टाकून बोलणे, त्यांच्या चुकांवर माणसाने खंत काढणे, चुकांबद्दल रागावणे वगैरे गोष्टी रोज घडत असतात. व त्यात काही विशेष गोष्ट झाली असे कोणाच्या ध्यानातही येत नाही. परंतु मोठ्यांपेक्षाही लहान व्यक्तीस अपमान जास्त जाचतो; कारण ती लहान असल्यामुळे त्याचा त्यांना प्रतिकार करता येत नाही. केलाच तर तो मोठी सहन करून घेत नाहीत. मोठी अधिक बलवान असल्यामुळे नेहमी त्यांचेच चालते. दुसरे म्हणजे लहानांना अधिक आपला लहानपणा खुपत असतो, त्यातून त्यांचा अपमान होतो तेव्हा तर जखमेवर जखमा झाल्यासारख्या वेदना होतात याची जाणीव मोठ्या माणसांनी ठेवली पाहिजे.

लहान मुलांशी वागताना मोठ्या मंडळींनी खालील नियम पाळावयास हवेत.

१. मुलांच्या हातून चूक झाल्यास त्याबद्दल चार माणसांच्या देखत विशेषतः त्यांचे मित्र किंवा बाहेरची कोणी आली असताना त्यांना बोलू नये. घरातल्याच माणसात बोलले तर एक वेळ चालेल, पण जितकी अधिक गंभीर चूक तितके एकांतात बोलणे अधिक परिणामकारक असते.

२. चूक झाली म्हणून रागावणे, दुरुत्तरे बोलणे, गाढव, मूर्ख, फाजील, अक्कलशून्य वगैरे म्हणणे किंवा मारणे, चोपणे किंवा शिक्षा करणे ह्या सर्व गोष्टी अपमानकारक व व्यक्तित्वाचा बोज घालविणाऱ्या असतात. चुका सर्वांच्या हातून होतात. लहानपणामुळे, अननुभवामुळे अथवा निष्काळजीपणामुळे मुलांच्या हातून त्या थोड्या जास्त होत असतील. पण जाणूनबुजून काही कोणी चूक करीत नाही. अर्थात मन विकृत झाले म्हणजे मात्र माणसे व मुले जाणूनबुजून वेडेवाकडे करतात. विकृतमानस होण्याची कारणे बहुधा घर म्हणून ज्या तऱ्हेचे वातावरण घरात प्रस्थापिले पाहिजे, ते नसते हीच असतात. मुख्य मुद्दा काय की, चूक ही चुकूनच होत असते व ती झाल्यामुळे ज्याच्या हातून ती होते त्याला आधी वाईट वाटत असतेच. त्यात कोणी ठपका दिला म्हणजे मन



अधिकच खट्टू होते. घाबरट किंवा कोडगे बनते. समजा, एक लहान मुलगी आपला नवा परकर व पोलके अतिशय हौसेने शेजारी अथवा मावशीकडे दाखवायला आली. बिचारीने आपल्याकडून अतिशय सांभाळून तो आणला व तसाच संभाळून तो परत नेत होती. नेता नेता वाटेत पोलके कुठेसे पडले. अर्थात तिला ते कळले नाही. तिचे हौसेने आणलेले पोलके गेल्याबद्दल तिला स्वतःलाच किती धक्का बसला असेल! मोठ्या माणसाच्या घरात चोरी झाली, घर जळाले किंवा दागिना हरवला तर त्यांना जसे गेल्याचे दुःख असते त्यापेक्षाही अधिक तीव्र वेदना लहान मुलास आपली वस्तू गेल्याबद्दल होतात. अशा प्रसंगी गेले तर गेले असे जरी म्हटले नाही तरी निदान कसा हरवलास, अगदी धांदरट आहेस, आता कधी काही शिवणारच नाही वगैरे पुष्पांजली वाहू नये. तिच्या मनावर आघात करण्याने तिच्यात जर धांदरटपणा असला तर तो द्विगुणित मात्र होतो. कारण, धांदरटपणा म्हणजे पुष्कळदा घाबरटपणा असतो. घाबरलेल्या माणसाच्या हातून चार चुका जास्तच होतात.

सारांश, चुकांकरिता बोलणे अवश्यच असेल तर निराळे व थोडक्यात बोलावे. दुसरे, जे बोलावयाचे ते चांगल्या भाषेत बोलावे, टाकून बोलू नये.

आमच्या शाळेत असे पुष्कळ प्रसंग येतात.

'तू भिंतींवर रेघोट्या काढल्यास?'

'होय.'

'भिंतीवर रेघोट्या वाईट दिसतात. भिंतीवर लिहायचे नाही. कागदावर रेघोट्या, फळ्यावर रेघोट्या.' मूल बहुधा एवढ्यानेच समजते. पुन्हा सांगायची पाळी येत नाही. पण आलीच तर पुन्हा सांगावे.

अगदी एकांतात अगदी गंभीरपणे, बहुधा नुसते विचारण्याने मूल अगदी खजील होऊन जाते.

पण, आपल्या पुष्कळशा बोलण्याचा परिणाम होत नाही याचे कारण आपण फार बोलतो. व अपमानकारक रितीने बोलतो. कोणाचा अपमान केला व त्यास प्रतिकार करता आला नाही तर त्यास निगरगट्ट व्हावे लागते. लक्षच न देणेतेवढा मार, नाहीतर शिव्या

खाऊन घ्यायच्या नि पालथ्या घागरीवर पाणी पडल्याप्रमाणे जणू गावीच नाही असे बसायचे, हीच प्रतिकाराची रीत पुष्कळ मुले अवलंबितात. त्यामुळे बोलण्याचा अथवा माराचा काहीच उपयोग होत नाही हे तर निराळेच. पण टाकून बोलण्याचा म्हणजे मुलाचा अपमान करण्याचा गंभीर परिणाम असा होण्याचा संभव असतो की त्यांना स्वमानही वाटेनासा होतो. आपले व्यक्तित्व व व्यक्तित्वाचा मान ही दोन्ही जर गेली तर मोठेपणी ती स्वाभिमानी व स्वमान राखून वागणारी अशी होणार नाहीत. स्वतंत्र बाण्याच्या स्वाभिमानी अशा व्यक्ती होण्याऐवजी लाथा खाण्यास तयार, शिव्या खाण्यास तयार, स्वतःविषयी हलका अभिप्राय असलेल्या अशा स्वमानहीन शेळपट व्यक्ती बनतात. याशिवाय गुन्हे करण्यास प्रवृत्त करण्याचे श्रेयही पुष्कळदा वडील मंडळींच्या टाकून बोलण्याकडेच असते. अशा प्रकारे बालकांच्या व्यक्तित्वाचा अवमान करण्याने पुष्कळ घोर परिणाम होण्याचा संभव असतो. मोठी माणसे जशी आपण एकमेकाशी बोलताना एकमेकांचा मान ठेवून बोलतो तसेच लहानाशी सुद्धा बोललो तर पुष्कळसे प्रश्न उत्पन्नच होणार नाहीत.

३. ''तुला काय येत आहे? तुला काय समजणार आहे? तुला काय पाहून करायचे?'' वगैरे प्रकारच्या वाक्यांनी त्यांच्यात स्वतःसंबंधी हीनभाव उत्पन्न करू नये. मुलांना आपले काम नसेल अशा जागी, अशा गोष्टींत विनाकारण डोके खुपसावेसे वाटते. त्याचे कारण, त्यांना माहीत नसते की गोष्टी आपल्या उपयोगाच्या नाहीत; पण अशा वेळी एखाद्या अपमानकारक वाक्याने त्याला तोडून टाकण्याऐवजी नुसते दृढपणे 'हो', 'नाही' म्हणणे चांगले. ''ही वस्तू आमच्या कामाची आहे. त्याला दुसऱ्यांनी हात लावायचा नाही.'' हा एक नियम सांगितला तर त्यात वाईट वाटण्यासारखे काही नाही. 'पण तुला त्यात काय समजणार?' तुला काय वाचता येतं? 'तू ते फोडशील' वगैरे म्हणू नये. त्यांना आपल्या स्वतःच्या अशक्तीचे भान सतत करून देणे त्यांच्या विकासास विघातक आहे.

यप्रमाणे घरामध्ये प्रत्येक व्यक्तीचा योग्य सन्मान राहील यांकडे सर्वांनी लक्ष द्यावयास हवे. मुख्यतः घरचे तंत्र चालविणारी मंडळी



या बाबतीत काळजी घेणारी असली म्हणजे सर्व गोष्टी व्यवस्थित चालतात.

याचा अर्थ एकमेकांशी वागण्याची रीत अत्यंत कृत्रिम व वरपांगी असावी असा नाही. परंतु थोडी काळजी घेतली, बोलण्यापूर्वी थोडा विचार केला तर आपल्या वर्तनाने दुसऱ्याचा अपमान करीत आहोत किंवा काय ते आपल्या सहज लक्षात येऊ शकते. लहान मुलाशी बोलताना कसे बोलावे त्यासंबंधी खास विचार करून काही दिवस मुद्दाम सवय पाडावयास हवी. कारण, तोडून बोलणे आपल्या अंगवळणी पडलेले असते. धाकटा नाना कामात आहे. त्याला आपला निरोप सांगायला पाठवायचे आहे. 'हे पहा, नाना, एक काम आहे. करतोस का? त्या रमाकाकूंकडे जाऊन एवढा निरोप सांग' असे म्हणण्याऐवजी सामन्यतः माणसे असेच म्हणतात की, 'जा रे नान्या, ऊठ ठेवून दे तुझे काम. चट्कन जाऊन एवढं सांगून ये बघू.' त्या मुलासंबंधी किंवा त्याच्या कामाविषयी जराही दरकार न दाखवता केवळ आपण मोठे आहो, म्हणून हुकूम सोडीत असतो. मुले आपल्या कामात अथवा खेळात गुंतली असल्यास त्यांची थोडी अभिमुखता लागते. म्हणजे त्याचे मन आपल्याकडे ओढून घ्यावे लागते. अभिमुख असताना 'जा बाळ, पाणी घेऊन ये.' एवढे म्हणून चालते.

सारांश, मोठ्या माणसांप्रमाणे लहानासही व्यक्तित्व असते व त्याचा मान ठेवूनच त्याच्याशी वागण्यात त्यांचे व आपले हित आहे. त्या योगाने घर फुलण्याफळण्यास मदत होते.





# ४. उद्योग

घरामध्ये मोठी व लहान यांच्यामध्ये पुष्कळ चकमकी झडत असतात. त्यापैकी काही चकमकी मुलांना उद्योग नसल्यामुळे होत असतात. योग्य प्रकारचा उद्योग मिळाला नाही तर मुले जे हाती येईल ते घेऊन सुचेल ते करू लागतात. स्वाभाविकपणे तो बहुधा अव्यापारेषु व्यापार असतो. आई, आजी, वडील, वगैरे आपल्या कामात असतात, त्यामुळे प्रथम लक्ष जात नाही. मग लक्ष गेले म्हणजे कळून येते की, शाईच्या दौतीत बोटे बुडवून भिंतीवर छापे चालले आहेत, नाहीतर डाळ, तांदूळ, मूग, गहू सगळे एक झाले आहेत, किंवा आईच्या शिवणाच्या यंत्राशी काही काम चालले आहे किंवा दादाचा कॅमेरा उघडून फोटो घेण्याचे काम चालले आहे. ज्याची वस्तू मुलाने घेतली असेल ते माणूस एकदम कडाडते; आजूबाजूची इतर वडील माणसेही त्याला मिळतात व त्या लहान मुलावर जोराचा हल्ला सुरू होतो. कधी धपाटे ऐकू येतात, कधी नुसती पुष्पांजली तर कधी कानाची खुंटी पिळली असल्याने नुसतेच रडणे ऐकू येते.

दोन वर्षाच्या आतल्या मुलाला कोणी तरी पाहणारे, संभाळणारे असते व त्याने केलेल्या खोड्या न समजता झालेल्या असे स्वीकारण्यात येत असल्यामुळे त्यांच्या निरुद्योगी उद्योगाचे परिणाम त्याला फारसे भोगावे लागत नाहीत. परंतु तीन वर्षानंतरचे मूल म्हणजे त्याचे उद्योगही थोडे मोठे व वर मोठ्यांकडून नेहमी शेरा मिळत असतो की, "तू आता लहान का? एवढं समजत नाही?" अर्थात मोठ्यांची त्याच्यासंबंधी अशी अपेक्षा असते की आता त्याला सगळे समजू लागले आहे, तेव्हा आता त्याने अव्यापारेषु व्यापार करू नयेत. परंतु तीन–चार वर्षांची काय; पण दहाबारा वर्षांची मुलेही पुष्कळदा असलेच काही नसते उद्योग करीत



असलेली दिसून येतात. खरे म्हटले असता १-२ वर्षांची लहान असोत की, ८–९ वर्षांची असोत, सर्वांचे नसते उद्योग योग्य उद्योगाच्या अभावीच घडून येत असतात.

मोठ्या माणसांना पुष्कळ उद्योग असतातच, नसेल तर काही शोधूनही काढता येतात. याशिवाय उद्योगाशिवाय आळसात वेळ कसा घालवायचा ही कलाही पुष्कळांना साधलेली असते.

मुलांच्या बाबतीत या तिन्ही गोष्टी नसतात. एक तर त्यांना पुरेसा उद्योग मिळेल असे कोणीच पहात नाही. सामान्यतः "मुलांना काय येणार आहे?" "त्यांना काय करायचे आहे काम करून? त्यांनी आपलं खेळावं", असा मोठ्या मंडळींचा समज असतो. त्याच्या उलट मुलांना इतकी तीव्र इच्छा असते की, त्यांच्याच्याने मुळीच गप्प बसवत नाही. त्यामुळे "थांब, आता तुला शाळेत अडकवलं पाहिजे" असे म्हणायची पाळी येते. शाळेतही बहुधा कैदच असते. उठायचे तेसुद्धा परवानगीने व बसायचे ते सुद्धा परवानगीने. तरी देखील अगदी निरुद्योगापेक्षा मनाला काही उद्योग तरी मिळतो. इतर बरोबरीची मुले तरी मिळतात. म्हणून घरच्या घरी काही एक न करता स्वस्थ बसण्यापेक्षा पुष्कळांना जशी असेल तशी शाळा पसंत पडते.

दुसरे योग्य उद्योग नसले तर काही तरी उद्योग मुले हुडकून काढतात. पण मोठी माणसे आपल्याकरिता जेव्हा उद्योग शोधून काढतात, तेव्हा तो सर्वांना मान्य असतो, मग तो कसाही असो. त्यांनी चार मंडळी गोळा करून पत्ते मांडले, आरडाओरडा केला, हसाहशी सुरू केली, घरातले एखादे खोके मोडून दुसरे काही करायचे ठरविले, इकडचे सामान तिकडे फिरविले, सर्व पितळेचे डबे काढून चिंच लावून घासायला काढले; जे काही ती करतील ते मान्य असते. कारण त्यांच्या हातात सत्ता असते. मुलेही काही तरी उद्योग शोधतात. पण तो बहुतेक वेळा मान्य नसतो. व त्यामुळे त्यांची कामे 'नसत्या' कामात गणली जातात.

तिसरे म्हणजे, अंथरुणात पडून २-३ तास झोप काढणे किंवा शेजाऱ्याशी चकाट्या पिटणे किंवा असे काही करून आळसात दिवस

काढणे मुलाला अत्यंत जड जाते. आदल्या दिवशी ताप आला होता म्हणून विछान्यावर निजून राहायची पाळी आली तर मुलाला महासंकट वाटते. त्याची तेथल्या तेथेच पण काहीतरी चुळवुळ चाललेलीच असते.

अशा प्रकारे मुलाला पुरता उद्योग न मिळाल्यामुळे ते काहीतरी न करण्याच्या गोष्टी करते. चिडणे, रडणे, हट्टास पेटणे, वगैरे प्रकारही पुष्कळदा उद्योगाच्या अभावी आलेल्या कंटाळ्याचाच परिणाम असतो. एकंदरीत उद्योगाच्या अभावी बालजीवन फार दुःखीकष्टी होते. पालकांच्या दृष्टीने शाळेत अडकवणे सोपे व आपल्या पाठची ब्याद काढण्यासारखे असले तरी, शाळेतही मुलांना हवा तसा उद्योग मिळत नाही. काही करण्यास शिकायच्या ऐवजी काहीएक न करता तासन्तास स्वस्थ एका जागी कसे बसायचे त्याचेच शिक्षण शाळेत मिळत असते. ही परिस्थिती वदलावी म्हणूनच आता Activity School वगैरेसारखी पुस्तके व वर्धा शिक्षण योजनेसारख्या योजना पुढे येत आहेत.

उद्योग म्हणजे बालकांच्या बाबतीत एक जादू आहे असे थोड्या अनुभवाने दिसून येईल. मुलांना योग्य असे उद्योग द्या की मुले अगदी सुतासारखी सरळ वागतात, आनंदी राहतात. त्यांचे भांडणतंटे फारसे होत नाहीत. त्यांचा आरडाओरडा की गोंगाटाचा त्रास होत नाही. खरोखर ती जादूची कांडी आहे.

जेथे योग्य उद्योगक्रम आखलेला आहे अशा शाळेत आक्रस्ताळी गणलेली म्हणजे २ ते ६ वर्षापर्यंतच्या वयाची ५०/६० मुले शांतपणे आपापली कामे करीत असतात हे पाहून पुष्कळ पालकांना नवल वाटते. घरात या वयाची एक दोन मुले असली की सळो की पळो करून सोडतात व घर डोक्यावर घेतात आणि नाही नाही ते करून रोज मार खाण्याचे प्रसंग उत्पन्न करतात, ती ५०/६० मिळून शाळा व शाळेतील शिक्षकांना उडवून कसे देत नाहीत ही आश्चर्याची गोष्ट आहे असे पुष्कळांना वाटते. या शाळेत त्यांना पकडून, दाबून, धाकाने, लालचीने वगैरे, कोठल्याही कृत्रिम उपायाने शांत बसवीत नाहीत. पण त्यांच्या मनाला, हाताला पायाला, उद्योग हवा असतो व दिला जातो.



मुले झाडू लागली तर त्यांना आवरेल अशी केरसुणी आणून द्यावी व कचरा भरायला टोपली पुढे करावी. ती टेवले, दारे पुसायला लागली तर ओल्या फडक्याने कशी पुसायची ते दाखवून सर्व धूळ कशी काढायची तेही दाखवावे. कातरी द्या, सुईदोरा द्या, कानस द्या, डिंक द्या, पेटी द्या, चित्र काढायला कागदपेन्सिल द्या, खडू द्या, चित्र पहायला पुस्तके द्या, मातीत खेळायला पाणी व रेती द्या. भांडी घासायला, धुणे धुवायला, स्वयंपाक करायला, वाढायला, बगिच्यात खोदायला, माती वाहायला, एक ना दोन काय वाटेल ते व्यवस्थित करायला द्या. इतकेच नाही, तर त्या कामाचा योग्य तो गौरव करा. त्यामुळे मुले सुखी दिसली, शांत दिसली, प्रफुल्ल दिसली, आज्ञाधारक दिसली, तृप्त दिसली, तर त्यात काय नवल?

घरामध्ये सुद्धा हीच प्रफुल्लता, हेच समाधान, हीच शांती, हाच आज्ञाधारकपणा दिसेल. पण मोठ्यांनी त्यांची उद्योगप्रियता स्वीकारली पाहिजे, त्यांना योग्य ती साधने दिली पाहिजेत व अनुभवाने किंवा नवशिकेपणाने होणारे नुकसान अथवा बिघाड याचा राईचा पर्वत करून फार गाजावाजा करता कामा नये. एखादे वेळी कातरी हातात असताना एखादे मूल आपला फ्रॉकही कापून ठेवील. पण त्याच क्रियेला योग्य वळण लावले, नुसत्या रद्दी कागदाच्या ऐवजी फडक्याचा तुकडाही कापायला दिला व दुसरे काही कापायच्या आधी मोठ्यांना विचारायचे अशी शांतपणे इशारत दिली तर कातरीचा दुरुपयोग तेथे थांबेल. पण त्या ऐवजी फ्रॉक फाडल्याबद्दल आईने जर अकांडतांडव केले, "थांब, आता नवीन शिवणारच नाही," किंवा "तश्शीच शाळेत पाठवीन," किंवा तिकडे सांगून चांगला चोप देववीन, किंवा "आता कातरी मिळायची नाही," वगैरे धाकदपटशा झाला तर लाग साधून त्या मुलीने कातरी हातात येईल तेव्हा आईचे उंची लुगडे फाडले किंवा असेच काही अनन्वित केले तर त्यात आश्चर्य नाही.

सारांश, घरात मुलांना उद्योग मिळाले पाहिजेत व प्रत्येकाच्या कक्षेप्रमाणे जी त्यांची उद्योग कामे असतील त्यांचा पूर्ण मान ठेवला

पाहिजे. आपले शिवणाचे तुकडेतोकडे तेवढे कामाचे व लहान छोट्याने फाडलेले कागद किंवा गोळा केलेले दगड बिनकामाचे, आपण लिहिलेले किंवा काढलेले चित्र कामाचे व बंड्याने काढलेल्या रेघोट्या निरर्थक समजून कचऱ्याच्या टोपलीत टाकण्यासारख्या समजता कामा नये.

उद्योग रोज उठून काय द्यायचा असे पुष्कळदा वाटते. वर उद्योगाची थोडी यादी दिलीच आहे. मुलांना लहान लहान गोष्टी पुरतात. मात्र त्यांचे काय करायचे त्याबद्दल त्यांना पूर्ण मुभा असली पाहिजे. प्रत्येक काम मोठ्यांच्या सूचनेने व त्यांच्या देखरेखीखाली करण्याचा त्यांना कंटाळा येतो. थोडे चुकलेमाकले याकडे आपण लक्ष न देता त्यांच्यावर जबाबदारी सोडली तर ती पुष्कळ शांतपणे कामे करीत बसतात.

उद्योगासंबंधी एक दोन गोष्टी लक्षात घ्यावयास हव्यात. पहिली गोष्ट म्हणजे मूल दुरुद्योगात गुंतले आहे किंवा काय, हे पाहिले पाहिजे. दुसऱ्याचे नुकसान होईल, त्रास होईल अशा प्रकारच्या उद्योगापासून त्यांना परावृत्त केले पाहिजे. पण ते नुसते नाकाराने भागायचे नाही. त्याऐवजी काय करायचे ते दाखवून दिले म्हणजे मूल दुरुद्योग करण्याचे स्वाभाविकपणेच थांबते. कारण दुरुद्योग बहुधा उद्योग न मिळाल्यामुळे उपस्थित झालेला असतो. म्हणजे मुलांच्या मनात काही फोडायचे, तोडायचे, दुसऱ्याचे नुकसान करायचे, दुसऱ्यास त्रास देण्याचे नसून सहजगत्या ते काहीतरी करते व ते दुरुद्योगात गणले जाते. मात्र कधीकधी मुले जाणूनबुजून विनाशक प्रवृत्ती दाखवितात व चांगल्या गोष्टी बिघडवण्याच्या कामास लागतात. कोणी चित्र काढीत असेल ती पायाने पुसून टाकायची, वगैरे अनेक प्रकार दिसून येतात. या विनाशक प्रवृत्तीचे मूळ शोधून काढून त्यावर उपाययोजना होईपर्यंत ती विनाशक कामे चालवून घेता कामा नये; ती तर थांबवलीच पाहिजेत.

दुसरी गोष्ट म्हणजे, कधीकधी मूल दिसायला उद्योगात दिसते, शांत असते, काही तरी करीत असते; परंतु खऱ्या उद्योगात नसते. नुसते वेळ काढण्यासाठी काही तरी करावयाचे म्हणून करीत असते. बालशाळेत असे पुष्कळदा घडते व शिक्षकांना या बाबतीत फार सावध असावे लागते.



शिक्षक तसे सावध नसले तर मूल दिसायला कामात असून, कोणत्याही प्रकारची गडबड, दंगाधोपा वगैरे करीत नसून प्रगती पाहावी तर काही नाही. याला अनुद्योग म्हणता येईल. त्याची अनेक कारणे असू शकतील. एक तर खरे आवडीचे काम हाती आलेलेच नसते तोपर्यंत कसातरी वेळ काढायलाच हवा असतो म्हणून मुले काही तरी करीत असतात.

दुसरे, पुढचे काही सुचत नाही, शिक्षक किंवा दुसरे कोणी काही दाखवीत नाही, तेव्हा काय करायचे? येत आहे तेवढे तरी करीत बसा असे होते. पण ते करण्याने मुलांना गंमत किंवा आनंद वाटत नाही. ती कंटाळलेली व काम सोडण्यास एका पायावर तयार अशी असतात.

कधीकधी प्रकृतीस बरे नसल्यामुळे अथवा मन खट्टू असल्यामुळे मुले अशी काही तरी करीत बसतात. मन फुलून उद्योग करण्याचे तर सुचत नाही, तेव्हा कसा तरी वेळ घालविण्याचे साधन म्हणून काही तरी हातात घेऊन बसतात. अशा वेळी त्यास विश्रांती देणे अथवा त्याच्या वाटेस न जाणे हेच बरे असते.

कधीकधी अधिक कठीण कामे शिकण्याचा काही काही मुलांत आळस असतो. येत आहे त्यापेक्षा अधिकाधिक कठीण घ्यावे, नवेनवे शिकावे अशी सर्वसामान्यांची प्रवृत्ती असते. पण काही अशी भेटतात की, आठ वर्षाचे झाले, दहा वर्षाचे झाले, तरी आपले साधे मणीच ओवीत बसणे किंवा कागद घेऊन निर्हेतुकपणे तुकडेच करीत बसणे त्यांना आवडते. अशी मुले तत्कालिक किंवा नेहमीच्या मंदबुद्धी बालकांत जमा होतात. त्यांना जरा कठीण, जरा झरझर, जरा निराळे असे मुद्दाम करायला लावून पुढे नेले पाहिजे.

दुरुद्योग व अनुद्योग यासंबंधी विवेचन करीत बसले तर पुष्कळ आहे. कारण दोन्ही प्रकार पुष्कळ अंशी मानसिक व्यंगांमध्ये अथवा रोगी अवस्थेत येतात.

एकंदरीत उद्योगाचे महत्व लक्षात घेऊन मुलांना घरामध्ये निरनिराळे उद्योग देण्याची व्यवस्था केली तर मुलांचे जीवन तर आनंदमय होईलच, परंतु घरच्या वडील मंडळींच्या पाठचा किती त्रास कमी होईल. मुलांमुळे गांजून जाणे वगैरे सर्व बंद होईल. त्यांना आपल्या कामालाही हवी तितकी फुरसत मिळेल.

# ५. व्यवस्था व नियमितपणा

ज्या घरात व्यवस्था व नियमितपणा नांदतात तेथे बालके सुखी व आनंदी असतात.

अव्यवस्था व अनियमितपणा यांनी मुलांचे मन गोंधळून जाते, त्यांचे जीवन फार त्रासदायक होते; ती कंटाळून जातात व स्वतः दुःखी होतात आणि आसपासच्यांनाही दुःखी करतात.

पुष्कळांना असे वाटते की, मुलांना अव्यवस्था आवडते. व ती फार अव्यवस्थित असतात खरी स्थिती याहून वेगळी आहे. मुलांना व्यवस्था अतिशय प्रिय असते. उलट थोडीशी अव्यवस्था आपण चालवून घेऊ; पण त्यांना ती चालत नाही. आपण आपल्याला काय करायचे, बोलायचे, ठेवायचे, उचलायचे, त्यातच गुंग असतो. पण त्यातून जरा मन काढून मूल काय करते ते पाहू लागलो तर आपल्याला दिसून येईल की, मुलांना एकदा जर व्यवस्था लावून दिली तर ती कदापि फिरवू इच्छित नाहीत. दीड–दोन वर्षाच्या किंवा क्वचित लहान मुलांत अशी व्यवस्था दिसून येते.

आमच्या शेजारचा एक मुलगा आहे. पुरते बोलताही येत नव्हते; तरी घरात कोणता पाट कोणाचा, कोणते फुलपात्र कोणाचे, वगैरे सर्व त्याने मनाशी नक्की करून ठेवले होते. जेवायला बसताना जर कदाचित एकाचा पाट अथवा फुलपात्र दुसऱ्यास गेले तर खुणेने न बोलता, येत होते तेवढे बोलून पण सांगायचा व ज्याचे त्यास घ्यायला लावायचा.

दुसरा एक मुलगा आपल्या मामाच्या घरी होता. मामा सकाळपासून बाहेर जायचा तो संध्याकाळी परत यायचा. दिवसभर त्याच्या घरी घालावयाच्या खडावा व इतर वस्तू त्याच्या खोलीत पडलेल्या असायच्या, तर तो मुलगा दुसऱ्या कोणालाही त्यांना हात लावू द्यायचा नाही किंवा इकडच्या तिकडे सरकवू द्यायचा नाही. तोही असाच दोन वर्षाचा होता.



चपला बाहेर ओळीने लावून ठेवण्याचे शाळेत दाखविण्यात आले तर कित्येक मुले घरी जाऊन स्वतःच्या चपला. जोडे ओळीने ठेवतात व घरच्या माणसानाही तसे करावयास सांगतात. शाळेत हात धुण्याच्या वेळी अमुक अशी व्यवस्था, गाण्याच्या वेळी अमुक, जेवायच्या वेळी अमुक, चित्रकामाचे वेळी अमुक अशी व्यवस्था लावून दिली व तिच्यात थोडा फेरबदल झाला किंवा जर एखादे वेळी त्यापैकी व्यवस्थित झाले नाही तर मुलांना ते असह्य होते.

ज्यांनी लहान मुलांच्या आवडीनिवडी, वागण्याची पद्धती व सवयी यांचा सूक्ष्म अभ्यास केला आहे, अशा शिक्षणवेत्त्यांचे असे मत आहे की, अगदी अर्भकावस्थेत बालकांच्या विकासास निश्चित व्यवस्था ही फार आवश्यक आहे. त्यांची नवीन व्यवस्था चटकन लक्षात घेऊन स्वतः तिच्यात समरस होऊन जाण्याची शक्ती कमी असते. आधी मुलातच आजूबाजूच्या जगातील घडामोडी समजण्याची शक्ती कमी झालेली नसते. त्यांचा अनुभव, आपल्या व्यवहाराची माहिती, परिचय व विचारशक्ती सर्वच कमी असल्यामुळे आसपासच्या घडामोडीत एकदम काही फरक झाला तर त्यांचे मन फार गोंधळते. त्यामुळे घरातील वस्तुंची जागा व घरातील व्यवहाराच्या वेळा व व्यवहाराच्या रीती–भाती सतत सारख्या असल्या तर एकसूत्रीपणा समजून घेणे अधिक सोपे जाते. काठी एक दिवस कोपऱ्यात ठेवली, दुसऱ्या दिवशी मधल्या खोलीत टेबलावर तर तिसऱ्या दिवशी आणखी कोठे, असे झाले म्हणजे मूल घोटाळते. परंतु तेच ज्या घरात सर्व वस्तू व्यवस्थितपणे ठेवण्याची रीत असते तेथे मुलास वस्तूंची जागा, उपयोग वगैरे लवकर ध्यानात येते.

पुष्कळ ठिकाणी मोठ्यांचे सर्व व्यवस्थित असते, पण मुलांच्या वस्तू कशा व्यवस्थित ठेवायच्या त्याबद्दल काही सूचना नसतात की सोय नसते. उदाहरणार्थ, आईचे कपडे ठेवायचे कपाट अथवा खण असेल, तर त्यातच एका बाजूस आई मुलांचे कपडे ठेवून देते. आईला ते व्यवस्थित लावताही येतात आणि जरी तिचे व मुलांचे कपडे एकत्र झाले तरी तिला ते फार घोटाळ्याचे वाटत नाही. कारण तिला झबले, परकर, चड्डी, पोलके, चोळी सर्व आकारावरून, रंगावरून, कापडाच्या जातीवरून

वगैरे ओळखायची सवय असते व ओळखणे कठीण नसते. पण मुलांना एवढ्या मोठ्या भांडारातून स्वतःचे कपडे सापडावयास त्रास होतो. याकरिता मुलांची खोली व त्यांचे सामान ठेवण्यास त्यांना पेटी, कपाट वगैरे असण्याची फार जरुरी आहे. त्याचप्रमाणे वस्तू ठेवण्याबाबतच्या स्पष्ट, थोडक्यात व वारंवार न बदलणाऱ्या अशा सूचना द्यावयास हव्यात. त्यांनी आपल्या काचा, दगडी, चिठोरा वगैरे कोठे ठेवायची त्याचा एखादा कोपरा, एखादे शेल्फ किंवा एखादे लहान कपाट, एखादी लहानशी पेटी तरी मुलास निराळी, त्याची स्वतःची अशी असावयास हवी. आपण मुलांचे लाड करण्याकरिता, त्यांना आनंद वाटावा म्हणून किती किती किंमती वस्तू त्यांना आणून देतो. पण लहानशा साध्या वस्तू दिल्याने त्यांची इतकी सोय होते की, त्यांना जास्त आनंद वाटतो. एखादी पिशवी, एखादी बॅगवजा पेटी, त्यांच्या उंचीच्या मानाने दीडदोन फुटावर लावलेल्या खुंट्या, त्यांची चाकू, कातरी वगैरे स्वतःची स्वतः ठेवण्यासारखी छोटी हत्यारे व ती जपून ठेवण्यासाठी पेटी वगैरे गोष्टी द्याव्या. त्यांना अत्यंत सुख होते. कारण अव्यवस्थेने फार गोंधळ व घोटाळा होतो. त्यामुळे परिणामी ती थकतात.

आपण मुलांना सामान्यतः अव्यवस्था करणारीच समजतो. त्यांना अव्यवस्थाच प्रिय असते असेही आपल्याला वाटते. पण ह्या दोन्ही समजुती चुकीच्या आहेत. मुले अव्यवस्था करतात ही गोष्ट खरी आहे. पण त्याचा अर्थ असा नाही की, मुलांना अव्यवस्था आवडते अथवा त्यांचा मूळ स्वभावच अव्यवस्थाकारक असतो.

मुलांच्या हातून अव्यवस्था होते त्याची कारणे अनेक आहेत. पहिले आपण विशेष लक्ष देण्यासारखे कारण हेच की, आपणच आपल्या घरात तितके व्यवस्थित नसतो व दुसरे म्हणजे मुलांना व्यवस्था कशी ठेवायची ते दाखवीत नाही. व्यवस्थितपणावर व्याख्यान देऊन अथवा उपदेश करून तो अंगी येत नाही. डॉ. मॉंटेसरीनी अडीच ते चारपर्यंतच्या मुलांच्या अभ्यासक्रमात 'व्यवस्था' हा एक विषय ठेवलेला आहे व त्यावर जसे भूगोलाचे किंवा गणिताचे पाठ द्यायचे तसे शिक्षकाने मुलास



पाठ द्यावयाचे असतात. कोठलीही वस्तू कशी घ्यायची, कोठे ठेवायची व वापरून झाल्यावर परत कशी ठेवायची ही सर्व त्या पाठांची अंगे असतात. त्याप्रमाणे पहिल्यांदा आपण करून दाखविले पाहिजे, नंतर मुलास तसे नेहमी करण्याबद्दल सुचविले पाहिजे.

नंतर व्यवस्थेत काही फेरबदल झाला तर त्याबद्दल वेळीच सूचना द्यावयास हव्या. अशा सूचना शक्य तितक्या थोड्या शब्दांत पण स्पष्ट असाव्यात. त्यांच्या मागेपुढे लांबलचक वाक्ये व वर्णने नसावीत. मुले नुकतीच भाषा शिकायला लागलेली असतात, तेव्हा फार बोललेले त्यांना काहीच समजत नाही.

मुलांना एकदा दोनदा दाखविले किंवा सूचना दिल्या म्हणजे त्यांना एखादी गोष्ट करणे साधून जाते असे नाही. ती करण्याची त्यांची इच्छा असते, प्रयत्नही असतो; पण ती साध्य झालेली नसते. त्यांच्यापुढे अनेक अडचणी असतात. त्यामुळे कळले म्हणजे चटकन वळतेच असे नाही. म्हणून ती साध्य करण्याचा जो प्रयत्न चालू असतो त्यात अवश्य असल्यास मदत करावी, नाही तर प्रयत्न होऊ द्यावा; मध्येच चूक काढून अथवा 'काल सांगितले मग आज का नाही केलेस?' असा ठपका देऊन अथवा अन्य प्रकाराने हिणवू नये. शिकण्यास वेळ द्यावा.

पुष्कळदा मुले व्यवस्था म्हणून करावयास जातात; पण आपल्या दृष्टीने ती अव्यवस्था होऊन बसते. त्या वेळी त्यांचा हेतू समजावून घेतला पाहिजे.

पुष्कळदा मुले नीट म्हणून करावयास जातात पण काहीतरीच होऊन बसते; म्हणजे सांडते, फुटते, हाताला लागते; वगैरे. रस्त्यात पडलेली दौत उचलून टेबलावर ठेवावी या हेतूने मूल उचलण्यास जाते पण अंगावर व इकडेतिकडे शाईच सांडून बसते. अशा प्रकारचे अपघात व त्यामुळे पुढे मार वगैरे मिळाल्याचे कित्येकांस स्मरत असेल.

या प्रकारे अनेक कारणांनी मुलांच्या हातून अव्यवस्था होते. तरी त्यांस जर योग्य उपचार झाले तर मुले व्यवस्थाप्रियच आहेत असे दिसून येईल.

व्यवस्थेच्या जोडीस नियमितपणाही गृहराज्यात हवा. अनियमितपणा व अव्यवस्था यांच्यामुळे मुले फारच हैराण होतात. 'वेळच्या वेळी, जागच्या जागी' हे बोधवाक्य गृहव्यवस्थापकांनी आपणापुढे सतत ठेविले पाहिजे. 'वेळच्या वेळी' हा जसा एक नियमितपणाचा अर्थ होतो तसाच 'परिमितता' असाही अर्थ करता येईल. खेळ काय, झोपणे काय की अभ्यास काय, प्रत्येकात परिमितता असावयास हवी. अर्थात नियमितपणा; परिमितता व्यवस्था याचा अतिरेक करून जीवन निष्प्राण व कडक करून टाकता कामा नये. प्रत्येक गोष्टीत काही एका प्रमाणात लवचिकपणा लागत असतो, याकरिता थोडी अव्यवस्था झाली तरी सहन करून पण कलानिर्मिती वगैरेस अवसर दिला पाहिजे.

एकंदरीत मुलांच्या जीवनात व्यवस्था व नियमितपणा ही फार जरुरीची तत्वे आहेत व आपल्या घरी त्यांना योग्य स्थान मिळालेच पाहिजे. याप्रमाणे आपल्या घरात प्रसन्नता, प्रेम, व्यक्तिसन्मान, उद्योग, व्यवस्था व नियमितता यांचे वातावरण उत्पन्न करून ते सतत राहील असे केले पाहिजे.

निसर्गक्रम म्हणून आपण यदृच्छेने आई-बाप होणे व पूर्वापार चालत आलेल्या रितीने मारहाण, शिव्याशाप, बळजबरी, धाक व हिरमोड करून बालकाच्या आत्म्याचे हनन करीत त्यांना यदृच्छेनेच अथवा आपल्या उलट उपायांना न जुमानता मोठे होऊ देणे हे आता चालावयाचे नाही. हे युग आहे शास्त्रीयतेचे. साधे कुत्रे पाळायचे असले तरी त्याबद्दल सखोल अभ्यास करावा लागतो व कुत्र्याचे मानसशास्त्र शिकावे लागते. तेव्हा यदृच्छेने आई–बाप होऊन बसणे व तत्कालिक क्षणिक लहरीप्रमाणे व स्वभावाप्रमाणे कधी गोंजारणे, कधी खाऊची लालूच दाखविणे, कधी अर्जीव करणे तर कधी दया उत्पन्न करणे, असले प्रकार; तर कधी याच्या उलट जमदग्नीचा अवतार घेऊन पोरांना सुरीच्या धारेवर धरणे व भीतीने हतप्राण करणे वगैरे चालायचे नाही.

योग्य प्रकारे वाढविणे म्हणजे काय याचा अभ्यास मातापित्यांनी केला पाहिजे. स्वतःच्या सुदृढ मानसिक व शारीरिक वाढीस योग्य असे



वातावरण, जोपासना व पोषण बालकांना मिळालेच पाहिजे. त्यांना आपण जन्माला घातले असल्यामुळे एवढे आपल्याकडून मागणे हा त्यांचा जन्मसिद्ध हक्क आहे व तो त्यांना मिळालाच पाहिजे.

आपला अविचार, भावनातिरेकाच्या आहारी जाणे, आपला धरसोडपणा, आपल्या घरातल्या दुहेरी अथवा तिहेरी राज्यपद्धतीप्रमाणे वेगवेगळ्या वडील व्यक्तींनी वेगवेगळे मार्ग अवलंबणे, वगैरे सर्व आपण विचारपूर्वक आवरले पाहिजे. आपल्या मनाला, आपल्या आवेश व आवेगांना आळा घातला पाहिजे. निसर्गाने आपल्याला सन्मानपूर्वक सोपवलेली ही नाजूक व अत्यंत महत्वाची जबाबदारी आपण हौसेने व प्रेमाने पार पाडावयाची आहे आणि आपले पितृत्व व मातृत्व सार्थ व कल्याणकारक होईल असे करावयास हवे. त्यामुळे आपल्या मुलाचेच हित होणार आहे असे नाही; तर आपले स्वतःचेही हित होणार. या योगसाधनेने आपण मनुष्यत्वाच्या उच्च पातळीवर चढू व त्यायोगे आपल्या जीविताचे कल्याण होणार आहे.

इतके खडतर तप कसे करू शकू? आम्ही सामान्य पामर माणसे! असे निराशेचे विचार कोणी मनात आणण्याची गरज नाही. निसर्गाने मोठी जबाबदारी दिली; त्याबरोबर स्नेहाने तुडुंब भरलेले माता–पित्यांचे हृदय दिले आहे. त्यामुळे आपल्या कोवळ्या रोपट्याची संगोपना करणे हे खडतर नव्हे तर आनंददायी काम बनले आहे. आपल्या प्रयत्नांचे गोड फळ आपल्याला तत्काळ चाखावयास मिळत असते. बगिचाचा योग्य संभाळ केला की रोपे वाढून आनंदाने डुलत, पाने, कळ्या, फुले, फळे देऊन माळ्यास आनंदून सोडतात. तसेच आपली गृहवाडीतील ही रोपे आपल्या प्रफुल्लतेने आपली हृदये हेलावून सोडतात व आपल्या प्रयत्नाचे गोड फळ चाखवीत आपल्याला अधिक प्रयत्नशील बनवितात. तेव्हा निराशेचे अथवा साशंकतेचे काहीच कारण नाही.

